**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Chhatrapati Sambhajinagar-431 004.**
**Maharashtra (India)**
**NAAC Re-accredited 'A' Grade**
Tele. :
Office PBX : (0240) 2403399/400
D.B.E.E. (Office): (0240) 2403178
Fax : (0240) 2403199
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : director.exameval@bamu.ac.in
coe@bamu.ac.in

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
छत्रपती संभाजीनगर-४३१ ००४.
महाराष्ट्र (भारत)
नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त

**Office**
**Director, Board of Examinations & Evaluation**
**कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

संदर्भ क्र.परीक्षा/बी.ए./प्रकल्प./२०२४-२५/ दि.२५.०९.२०२४

**प्रति,**
**मा.प्राचार्य/मा. संचालक,**
सर्व संलग्नित कला महाविद्यालये/परिसंस्था,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

**विषयः- बी.ए. P-2013 ऑक्टो/नोव्हें-२०२४ कला व सामाजिकशास्त्रे शाखेच्या प्रकल्प व प्रकल्प मूल्यमापनाबाबत.**

**महोदय/महोदया,**

या पत्राव्दारे सर्व संलग्नित कला शाखा अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना कळविण्यात येते की, विद्यापरीषदेच्या दि.३०.०५.२०१५ रोजीच्या निर्णयानुसार व मा.कुलगुरुंनी आदेशीत केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून कला व सामाजिकशास्त्रांच्या अभ्यासक्रमाच्या बी.ए.तृतीय वर्षास मुख्य ***(Main)*** विषयास १०० गुणांचा प्रकल्प अनिवार्य करण्यात आला असून सदर प्रकल्प परीक्षार्थीकडून तयार करून घेऊन त्याचे मूल्यमापन करून घेण्याबाबत खालील सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी.

१. परीक्षार्थीनी बी.ए. तृतीय वर्षास जो मुख्य ***(Main)*** विषय निवडला असेल त्या विषयाचा संगणकीकृत/टंकलिखित/हस्तलिखित प्रकल्प महाविद्यालयास सादर करणे अनिवार्य करण्यात आला आहे.

२. **दि.०७.१०.२०२४** पर्यंत परीक्षार्थीकडुन प्रकल्प महाविद्यालयात जमा करण्यात येउन सदर प्रकल्पांचे मूल्यमापन पूर्ण करावे व मुल्यमापनाच्या गुणयाद्या महाविद्यालयाने ***ADES (Assessment Data Export File)*** वर ***Data Entry*** करून ***(www.bamua.digitaluniversity.ac)*** या संकेतस्थळावर निकाल घोषित करण्याकरिता उपलब्ध झाल्याबाबतची खात्री करूनच हार्ड कॉपी प्रिंट ***(Hard Copy Print)*** संबंधीत परीक्षक/नियामक व प्राचार्य यांच्या स्वाक्षरीसह मोहोर बंद पाकिटामध्ये **दिनांक ११.१०.२०२४** पर्यंत मूळ प्रकल्प वहीसहित परीक्षा विभागातील संबंधीत कक्षाकडे पाठवून त्याची पोच घ्यावी.

३. प्रकल्पांचे मूल्यमापन करण्याकरिता बाहय परीक्षकांच्या याद्या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहेत. जर त्यातील परीक्षक उपलब्ध न झाल्यास संबंधीत विषयाचे विद्यापीठ नियमानूसार मान्यता प्राप्त शिक्षक ज्यास किमान तीन वर्षाचा अनुभव आहे अशा प्राध्यापकाची बाहय परीक्षक म्हणून नेमणूक करावी.

४. **बाहय परीक्षकांची नेमणूक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर *(Portal)* प्रकल्पासाठी देण्यात आलेल्या मान्यताप्राप्त परीक्षकांच्या यादीतुनच करण्यात यावी.**

**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Chhatrapati Sambhajinagar-431 004.**
**Maharashtra (India)**
**NAAC Re-accredited 'A' Grade**
Tele. :
Office PBX : (0240) 2403399/400
D.B.E.E. (Office): (0240) 2403178
Fax : (0240) 2403199
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : director.exameval@bamu.ac.in
coe@bamu.ac.in

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
छत्रपती संभाजीनगर-४३१ ००४.
महाराष्ट्र (भारत)
नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त

**Office**
**Director, Board of Examinations & Evaluation**
**कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

५. प्रकल्पांचे मूल्यमापन करण्याकरीता नियुक्त केलेल्या परीक्षकांचे मानधन मूल्यमापन पुर्ण झाल्यानंतर तात्काळ प्रति प्रकल्प रूपये १०/- प्रमाणे तसेच दैनंदिन भत्ता/प्रवास भत्ता महाविद्यालयाने अदा करावा व सदर देयक परीक्षा केंद्राच्या देयकात सादर करावे.

६. **दिनांक ११.१०.२०२४** नंतर विद्यापीठात दाखल करण्यात येणारे गुणयाद्या व प्रकल्प हे विहित मुदतीत सादर न केल्यास दिनांक- १४.१२.२०२१ रोजी झालेल्या **परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या प्रस्ताव क्रं- ६ नुसार निकाल लागल्याच्या दिनांकापासून पहिले १० दिवस रु.२०००/- रु दोन हजार फक्त प्रति विद्यार्थी आणि नंतरच्या ५ दिवसांसाठी रु. ३०००/- रु. तीन हजार फक्त प्रति विद्यार्थी दंड आकारुन निकाल घोषित करण्यात येईल त्यानंतर कुठल्याही सबबीवर कोणताही बदल करता येणार नाही** याची नोंद घ्यावी.

७. परीक्षा विभागात सादर करावयाच्या अहवाल किंवा अन्य परीक्षेच्या दस्तावेजांच्या प्रत्येक पानाच्या वरच्या उजव्या बाजूला परीक्षा केंद्र क्रमांक असलेला शिक्का लावावा. ज्यायोगे आपल्या परीक्षा केंद्राचे दस्तावेज सापडणे सोपे होईल. अन्यथा अहवालातील कागद (पेपर) गहाळ झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत परीक्षा केंद्राची राहील.

**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

१. या मूल्यमापन पत्राची प्रत समन्वयक, ई-सुविधा केंद्र यांना देण्यात येऊन कळविण्यात येते की, बी.ए. सहावे सत्राचे बैठक क्रमांक देण्यात येऊन प्रकल्प परीक्षेच्या गुणयाद्या ***ADES (Assessment Data Export File)*** वर ***Data Entry*** करण्याकरिता उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**